मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » मंगळवार, दि. 18 नोव्हेंबर 2025 | पान- 1

# समाजकारणातून राजकारणाकडे - एक निष्ठावान कार्यकर्त्याची वाटचाल

## विकसनशील प्रभाग : १२

**पिंपरी | प्रतिनीधी : निष्ठा आणि तत्त्वप्रणाली आपण गेल्या पंधरा वर्षांपासून आदरणीय शरदचंद्र पवार साहेब आणि आता अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून समाजकारण आणि राजकारणात सक्रिय आहे. सध्या प्रभाग क्रमांक १२ मध्ये काम करत असताना, मी माझ्या वाटचालीचा आधार ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे तत्त्व ठेवले आहे. समाजकारणातून राजकारणाकडे सेवाभाव या दृष्टीने वाटचाल केली असल्याची माहिती राष्ट्रवादीचे कट्टर कार्यकर्ते शरद वसंत भालेकर यांनी न्यूज एक्सप्रेस मराठी शी बोलताना सांगितली.**




२०१७ च्या निवडणुकीत आपण इच्छुक आणि प्रबळ उमेदवार असूनही, काही कारणास्तव मला माझी उमेदवारी मागे घ्यावी लागली.

मात्र, कोणताही खेद न बाळगता, आपण पक्षश्रेष्ठींच्या निर्णयाचा आदर केला आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा निष्ठावंत कार्यकर्ता या नात्याने निवडणुकीसाठी झोकून देऊन काम केले. मला सांगण्यास आनंद वाटतो की, कोणतीही नाराजी किंवा बंडखोरी न करता आम्ही केलेल्या प्रामाणिक कामामुळे, त्यावेळी विद्यमान असलेल्या नगरसेवकांच्या विरोधात राष्ट्रवादीचे संपूर्ण पॅनल (चारही उमेदवार) निवडून आणण्यात आम्हाला यश आले.

याचे कारण राष्ट्रवादीतील उमेदवारांमधील एकी, सामज्यंसपणा महत्त्वाचा ठरला. (उर्वरित २ वर...)

### विधायक उपक्रम आणि जनसंवाद

उमेदवारी न मिळाल्याचा कोणतीही खंत मनात न ठेवता, आपण सामाजिक कार्याचा वसा पुढे चालू ठेवला. विधायक उपक्रमातून नागरिकांशी असलेला संवाद आणि नाते आपण कायम जपले. प्रभागातील माझ्या मानसांना लागेत त्या मदतीसाठी धावून गेलो आणि यापुढेही त्यांच्या हाकेला ओ देत उभा असणार आहे. विशेष शिबिरे: महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष आरोग्य शिबिरे आयोजित केली. त्यातून अनेकांच्या आरोग्यांच्या समस्या दूर केल्या.

> "समाजकारणातून राजकारणाकडे माझी वाटचाल ही पद आणि शक्तीसाठी नाही, तर प्रभाग १२ मधील प्रत्येक नागरिकाच्या विश्वासासाठी आहे. मागील पंधरा वर्षांपासून मी ८०% समाजकारण आणि २०% राजकारण या तत्त्वावर काम केले आहे. आजही माझी एकच प्रतिज्ञा आहे – लोकांनी माझ्याकडे यायची गरज नाही, मीच लोकांच्या दारी जाऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव तयार असेन. माझ्या प्रभागाचे प्रश्न सोडवणे ही माझी जबाबदारीच नाही, तर माझे कर्तव्य आहे... आणि हे कर्तव्य पूर्ण करण्यासाठी मी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि पारदर्शकपणे झटत राहणार आहे."
>
> - शरद वसंत भालेकर.






### प्रभाग १२ मधील आव्हाने आणि संकल्प

आज प्रभाग १२ मध्ये अनेक ज्वलंत समस्या प्रलंबित आहेत. या भागाची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या पाहता, मूलभूत प्रश्न मार्गी लावणे हे मोठे आव्हान आहे.

### समस्या/आव्हाने प्रस्तावित उपाययोजना

रेड झोनमुळे प्रलंबित मूलभूत प्रश्न (वीज, पाणी, रस्ते, सांडपाणी व्यवस्थापन) शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमध्ये सामंजस्य निर्माण करून प्रश्नांना प्राधान्याने मार्गी लावणे.

रेडी रेकनर दरात सुधारणा व्हावी यासाठी पाठपुरावा करणे, शेतकऱ्यांचा मोबदला आणि भूसंपादनसारखे विषय मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणे.

### निधीचा सदुपयोग:

शिवजयंतीला मोठ्या मिरवणुका काढून होणारा खर्च टाळला आणि त्या निधीचा वापर महिला व युवा पिढीसाठी विविध उपक्रम राबवण्यासाठी केला.

### जनसंपर्काची नवी दिशा

जनसंपर्क अधिक प्रभावी करण्यासाठी, आपण स्वतःच्या जनसंपर्क कार्यालय (ऑफिस) न बसता फिल्डवर जाऊन प्रत्येकाच्या अडी-अडचणी समजून घेण्यास सुरुवात केली. लोकांना त्यांची कामे घेऊन माझ्या दारात यावे लागू नये, म्हणून मी स्वतःहून नागरिकांशी कनेक्ट वाढवण्यासाठी पुढाकार घेतला. यासाठी डिजिटल माध्यम, सोशल मीडिया आणि प्रत्यक्ष भेटीगाठींवर अधिक भर दिला. लोकांना त्यांच्या समस्या घेऊन आपल्यापर्यंत येण्याऐवजी, आपण त्यांच्यापुढे जाऊन त्यांचे प्रश्न समजून घेतले पाहिजेत, हा माझा प्रमुख उद्देश होता. या सर्व उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# महापालिका निवडणुकांच्या तयारीसह दैनंदिन कामकाजाचा आयुक्तांकडून आढावा

## मतदान केंद्रे, सुविधा, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व मतदार यादी अद्ययावत करण्यावर आयुक्तांचा भर



**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या तयारीनिमित्त शहरातील मतदान केंद्रांची स्थळनिश्चिती, निवडणूक कक्ष अधिकाऱ्यांची नेमणुकी, मतदान केंद्रांची सुविधा, अपंगजनांसाठी सोयी, मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, ईव्हीएमची सुरक्षितता, मतदार यादी अद्ययावत करणे, प्रभागांतील आवश्यक पायाभूत दुरुस्ती, प्रारूप मतदार यादीतील बदल आणि मतदानासाठी नागरिकांमध्ये जनजागृती वाढवण्याचे तसेच तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करण्याचे निर्देश आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी आज सार्वत्रिक निवडणुकीसह महापालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेतला.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, सहायक आयुक्त मनोज लोणकर, नगरसचिव मुकेश कोळप, मुख्य लेखा परीक्षक प्रमोद भोसले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सहशहर अभियंता बापू गायकवाड, मनोज शेठीया, अनिल भालसाकळे, स्मार्ट सिटीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजयराज यादव, उपायुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, डॉ. प्रदीप ठेंगल, सचिन पवार, सिताराम बहुरे, संदीप खोत, ममता शिंदे, उपआरोग्य वैद्यकीय अधिकारी अभयचंद्र दादेवार, सहाय्यक आयुक्त अतुल पाटील, किरणकुमार मोरे, अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, अमित पंडित, निवेदिता घार्गे, पूजा दूधनाळे, अश्विनी गायकवाड, मुख्य उद्यान अधिकारी महेश गारगोटे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत प्रथम शहरातील दैनंदिन सेवा, स्वच्छता व्यवस्था, खड्डेमुक्ती मोहिम आणि मास्टर प्लॅन अंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांची माहिती आयुक्तांनी मागवली. अवैध होर्डिंग हटविण्याची मोहीम, रस्ते प्रकाशयोजना, जलपुरवठा व ड्रेनेज यंत्रणेची स्थिती याबाबतही सविस्तर चर्चा करत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

तसेच, आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या तयारीसंदर्भात प्रशासनाच्या सर्व शाखांकडून अहवाल सादर करण्यात आले. नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी नियंत्रण कक्ष अधिक सक्षम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सर्व विभागांनी समन्वय राखत प्रलंबित कामे वेगाने पूर्ण करावीत, असे निर्देश आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. महापालिकेच्या मूलभूत सुविधा आणि सेवांवर अधिक भर देऊन कार्यक्षमता वाढवण्याचे आदेशही आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिले.

सर्व प्रभागांना विशेष मोहीम राबवून अवैध होर्डिंग तातडीने हटवण्याचे निर्देश देण्यात आले. सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या किंवा वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या बोर्डांवर तत्काळ कारवाई करावी, तसेच परवानाधारक होर्डिंगची माहिती अद्ययावत ठेवून महसूल विभागाशी समन्वय वाढवावा, अशा सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# भोसरीत कविता भोंगाळे यांच्या पुढाकारातून मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व रक्तदान शिबीर उत्साहात




**पिंपरी | प्रतिनीधी**

आमदार महेशदादा लांडगे यांच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जोपासत कविता भोंगाळे युवा मंच व गायत्री मंचतर्फे मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम विदर्भ मित्र मंडळ, भोसरी येथे उत्साहात पार पडला. स्थानिक नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिबिराला उत्तम प्रतिसाद मिळाला.

कामगार नेते सचिनभैय्या लांडगे व माजी नगरसेवक सागर गवळी यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, हडपसर येथील तज्ञ डॉक्टरांनी मोफत नेत्र तपासणी केली व शस्त्रक्रियेसाठी आवश्यक रुग्णांची निवड केली. या शिबिराचा लाभ शेकडो ज्येष्ठ नागरिकांना झाला. रक्तदान शिबिरातही युवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. सर्व रक्तदात्यांना आयोजकांकडून आकर्षक भेटवस्तू देण्यात आली. गोळा झालेले रक्त स्थानिक रक्तपेढीकडे सुपूर्द केले गेले.

कार्यक्रमाला भाजपा भोसरी मंडलाध्यक्ष अमोल डोळस, उद्योजक विनायकराव भोंगाळे, विदर्भ मित्र मंडळ अध्यक्ष अशोक भगत, भाजप जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र नांदुरकर, माथाडी कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजयभाऊ भोसुरे, रंजीत गव्हाणे सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ तांदळे मा. अध्यक्ष विदर्भ मित्र मंडळ, प्रकाश डिक्कर सचिव विदर्भ मित्र मंडळ, अनिल सचिन आसोले उपाध्यक्ष विदर्भ मित्र मंडळ, सुधाकर वसे माजी अध्यक्ष विदर्भ मित्र मंडळ पांडुरंग कातोरे सामाजिक कार्यकर्ते स्वातीताई शिर्के अध्यक्ष प्रभाग क्रमांक पाच महिला आघाडी मनीषाताई गगणे उपाध्यक्ष प्रभाग 5 महिला आघाडी शंकर कापसे उद्योजक द्रुपदाकाटे आजी उज्वलाताई पडवळ तसेच विविध मान्यवरांनी उपस्थित राहून या उपक्रमाचे कौतुक केले. सामाजिक कार्याला चालना देणारा हा उपक्रम आमदार महेशदादा लांडगे यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने आयोजित केला गेला असून नागरिकांमध्ये समाधान आणि कृतज्ञतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## समाजकारणातून राजकारणाकडे - एक निष्ठावान कार्यकर्त्याची वाटचाल

**पान १ वरून..**

**युवा आणि क्रीडा:**

विद्यार्थ्यांना रायटिंग पॅडचे वाटप केले. युवा पिढीला गेमिंग आणि डिजिटल माध्यमांतून बाहेर काढून मैदानी खेळांकडे वळवण्यासाठी विविध मैदानी स्पर्धेचे आयोजन केले. मातीचे महत्त्व मैदानी खेळातून पटवून दिले. संस्कृती आणि परंपरा: आपला सांप्रदाय, संस्कृती, आणि परंपरा यांचे बीज तरुण पिढीमध्ये रुजवण्यासाठी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले. किर्तनसोहळा आयोजित करून, धार्मिक परंपरा जपली .

**ढोल पथक:**

'हिंदवी' या ढोल पथकातून वादकांसाठी अनेक शैक्षणिक आणि सेवाभावी उपक्रम राबवले. मागील २६ वर्षापासून हे ढोलपथक उत्कृष्ट कार्य करत आहे. या पथकाच्या माध्यमातून अनेक सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबविणे, मदत करणे सुरु असते.

**इतर संकल्प:**

केंद्र, राज्य आणि महानगरपालिकेच्या अनेक विधायक योजना नागरिकांपर्यंत पोहोचवणे. ससज्ज वाचनालय काढणे. ज्येष्ठ नागरिकांसाठी कट्टा व विरंगुळा केंद्र उभारणे.उद्यानांची उभारणी करणे.

**निवडणूकीचा विश्वास**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष यंदा मला लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी देईल, अशी मला खात्री आहे. नागरिक माझ्या कार्याला बळ देतील आणि मला विजयी करतील, ज्यामुळे मला या सर्व संकल्पांची पूर्तता करता येईल. असा विश्वास वाटतो .

मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# महापालिकेच्या दोन प्रभागांतील आरक्षणात बदल

## महापालिकेचा निर्णय; वेळेत कर भरून अतिरिक्त भुर्दंड दंड टाळण्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी प्रभागातील जागांची आरक्षण सोडत मंगळवारी (ता. ११) काढली. त्यातील प्रभाग १९ व ३० मधील प्रत्येकी एका जागेत निवडणूक आयोगाने बदल सुचवले. त्यानुसार महापालिका आयुक्तांनी प्रभागनिहाय प्रारूप आरक्षण सोमवारी (ता. १७) प्रसिद्ध केले. त्यावर २४ नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना मागवल्या आहेत.




वेगवेगळ्या कारणांनी महापालिका निवडणूक १४ मार्च २०२२ पासून प्रलंबित आहे. आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ३१ जानेवारी २०२६ पूर्वी निवडणूक घ्यायची आहे. त्यासाठी राज्य सरकारने चार सदस्यीय पद्धतीने निवडणूक घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या १२८ जागांसाठी ३२ प्रभागांची आखणी केली आहे. त्याला अंतिम मंजुरी मिळाल्याने ११ नोव्हेंबर रोजी लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती (एससी) व अनुसूचित जमाती (एसटी), २७ टक्के आरक्षण कोट्यानुसार नागारिकांचा मागासवर्ग प्रवर्ग अर्थात इतर मागासवर्गीय (ओबीसी) यांसह कायद्यानुसार महिलांसाठी ५० टक्के जागा सर्वांसमक्ष सोडत काढून आरक्षित केल्या होत्या. सोडतीनुसार आरक्षित झालेल्या जागांचा तपशील निवडणूक आयोगाला सादर केला होता. त्यांनी प्रभाग १९ मधील 'ब' जागा आणि प्रभाग ३० मधील 'ड' या जागांच्या आरक्षणात दुरुस्ती सुचविली आहे. त्यानुसार दुरुस्ती करून महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी सोमवारी (ता. १७) प्रभागनिहाय प्रारूप आरक्षण प्रसिद्ध केले.

### सोडतीनंतर आरक्षित जागा

- प्रभाग १९ - विजयनगर- भाटनगर- पिंपरी कॅम्प - आरक्षण सोडतीमध्ये नियमानुसार 'अ' जागा 'एससी' आणि 'ब' जागा 'ओबीसीं'साठी राखीव झाली होती. थेट पद्धतीने आरक्षित करण्याच्या नियमानुसार या जागा ओबीसी महिलांसाठी आरक्षित झाल्या होत्या. 'क' आणि 'ड' जागा खुल्या (सर्वसाधारण) होत्या.

- प्रभाग ३० - कासारवाडी- फुगेवाडी- दापोडी - आरक्षण सोडतीमध्ये नियमानुसार 'अ' जागा 'एससी', 'ब' जागा एसटी आणि 'क' जागा ओबीसींसाठी राखीव झाली होती. 'ड' जागा खुली होती. सोडत पद्धतीने आरक्षित करण्याच्या नियमानुसार एससी महिलांसाठीच्या १० जागांचा कोटा पूर्ण झाल्याने 'अ' जागा एससी प्रवर्गासाठी खुली राहिली. त्या जागेवर एससी पुरुष व महिला निवडणूक लढू शकतात. 'ब' जागा एसटी महिलांसाठी आरक्षित झाली होती. 'क' जागा ओबीसींसाठी थेट पद्धतीने आरक्षित झाली होती. खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी 'ड' जागा प्राधिकृत अधिकाऱ्यांनी आरक्षित केली होती. त्यामुळे चारही जागा आरक्षित झाल्या होत्या.

> महापालिका निवडणूक प्रभाग आरक्षण सोडतीचा अहवाल निवडणूक आयोगाला सादर केला होता. त्यांनी प्रभाग १९ व ३० मधील जागांबाबत दुरुस्त्या सूचवल्या होत्या. त्यानुसार दुरुस्ती करून प्रभागनिहाय प्रारूप आरक्षण प्रसिद्ध केले आहे. त्यांवर २४ नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना मागवल्या आहेत.
> - सचिन पवार, उपायुक्त, निवडणूक विभाग, महापालिका.

### निवडणूक आयोगाने केलेले बदल

- प्रभाग १९ : विजयनगर- भाटनगर- पिंपरी कॅम्प : 'ब' जागेतील ओबीसी महिलांसाठीचे आरक्षण कमी करून प्रभाग ३० मधील 'क' जागेवर टाकले. ती जागा केवळ ओबीसी संवर्गासाठी आरक्षित होती. मात्र, तेथून ओबीसी महिला व पुरुष निवडणूक लढवू शकतात. थेट पद्धतीने 'क' जागा सर्वसाधारण (खुला गट) महिलांसाठी आरक्षित केली. त्यामुळे केवळ 'ड' जागा खुली राहिली आहे. येथून कोणीही निवडणूक लढवू शकतो.

- प्रभाग ३० : सोडतीच्या वेळी 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' चारही जागा आरक्षित झाल्या होत्या. निवडणूक नियमानुसार ते योग्य नव्हते. त्यामुळे प्रभाग १९ मधील 'ब' जागेतील ओबीसी महिलांसाठी थेट पद्धतीने टाकलेले आरक्षण निवडणूक आयोगाने कमी करून प्रभाग ३० मधील ओबीसींसाठी आरक्षित 'क' जागेवर टाकले. त्यामुळे तेथून आता फक्त ओबीसी महिला निवडणूक लढवू शकतील. त्यामुळे सोडतीच्या वेळी थेट पद्धतीने 'ड' जागेवर टाकलेले खुल्या वर्गातील महिलांसाठीचे आरक्षण कमी झाले असून, ती जागा सर्वांसाठी खुली झाली आहे. तेथून सर्व संवर्गातील पुरुष व महिला निवडणूक लढवू शकतात.

# महापालिका प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे शहर प्रदूषणाच्या विळख्यात : खासदार बारणे

## कोट्यवधी रुपये खर्च करुनही प्रदूषण कमी होत नाही; खासदार श्रीरंग बारणे

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड शहरात प्रचंड प्रदूषण वाढले आहे. लोकसंख्येने मोठ्या असलेल्या शेजारील पुण्यापेक्षा पिंपरीतील प्रदूषणात वाढ झाली आहे. शहर प्रदूषणाच्या विळख्यात सापडले आहे. याला सर्वस्वी महापालिका प्रशासन जबाबदार असून कोट्यवधी रुपये खर्च करुनही प्रदूषण कमी होत नसल्याचा आरोप शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केला आहे.

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांना पत्र दिले आहे. तातडीने प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना हाती घेण्याच्या सूचना खासदार बारणे यांनी केल्या आहेत. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, महापालिकेने शहराची विभागणी करुन साफसफाईचे कंत्राट दोन ठेकेदारांना दिले आहे. परंतु, नियमितपणे शहरातील रस्त्यांची साफसफाई होत नाही. रस्त्यांवर कचऱ्याचे ढिग दिसून येत आहेत. साफसफाई करताना वाहनांची धूळ उडत आहे.




वाहनांचीच धूळधाण उडताना दिसते. त्यामुळे धुळीने नागरिक त्रस्त आहेत. साफसफाईवर कोट्यवधी रुपये खर्च करुनही शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरातील रस्त्यांवर खड्डेच-खड्डे आहेत. पावसाळा संपूनही खड्डे बुजविले नाहीत.

शहरातील विविध भागात मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरु आहेत. परंतु, बांधकाम व्यावसायिकांकडून प्रदूषण रोखण्यासाठीच्या उपाययोजना केल्या जात नाहीत. खडी, वाळू, क्रश सँड यांची उघड्या वाहनातून वाहतूक केली जात आहे. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे प्रदूषण वाढले आहे. शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी नदीच्या पात्रात राडारोडा टाकला जात आहे. मैलामिश्रित पाणी थेटपणे नदीत सोडले जात आहे. नदी सुधारवर कोट्यवधी रुपये खर्च करुनही नदीची दयनीय अवस्था आहे. प्रशासन केवळ निविदा काढण्यात दंग आहे. वाढत्या प्रदुषणाचा ज्येष्ठ नागरिक, लहान मुलांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. श्वसनाचे विकार जडत आहेत. त्यामुळे प्रदूषण कमी करण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा सूचना खासदार बारणे यांनी महापालिका प्रशासनाला दिल्या आहेत.

# विमाननगरमध्ये वन-वे वाहतूक सुरू

## विमाननगर परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून वन-वे (एकमार्गी) वाहतुकीचा प्रयोग राबविण्यात आला.

**पुणे | प्रतिनिधी**

विमाननगर परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून वन-वे (एकमार्गी) वाहतुकीचा प्रयोग राबविण्यात आला. यामुळे प्रमुख चौकांमधील वाहतूक कोंडी सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

स्थानिक नागरिकांनी आणि सुरेंद्र पठारे फाउंडेशनने या रस्त्यावरील होणाऱ्या वाहतूक कोंडीकडे पुणे वाहतूक पोलिसांचे लक्ष वेधले होते. त्यानंतर पुणे शहर अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील आणि सुरेंद्र पठारे फाउंडेशनचे प्रमुख सुरेंद्र पठारे यांनी विमाननगर, एअरपोर्ट रोड, येरवडा, नगररोड परिसर तसेच खराडी बायपास चौक येथे वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर पाहणी केली होती.

यावेळी रस्ता रुंदीकरण, वन-वे सुविधेची गरज आणि महत्त्वपूर्ण वाहतूक बदल याबाबत प्रत्यक्ष ठिकाणी उभे राहून सविस्तर चर्चा केली. वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना सातत्याने त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे प्रभावी, शाश्वत व दीर्घकालीन उपाययोजना अंमलात येणे फार गरजेचे असल्याचे पठारे यांनी सांगितले होते. वाहतूक शिस्त बिघडणे, गर्दीच्या वेळेत वाढणारी कोंडी, रस्त्यावरील अवैध पार्किंग, चुकीचे वळण घेणे, त्यातून निर्माण होणारे अपघाताचे धोके आणि पादचाऱ्यांची वाढलेली असुरक्षितता असे अनेक प्रश्न गेल्या काही महिन्यांपासून या भागात प्रकर्षाने जाणवत होते. विशेषतः गर्दीच्या तासांत रुग्णवाहिका आणि इतर आपत्कालीन वाहने लांबच्या रांगांमध्ये अडकत असल्याने नागरिकांनी गंभीर चिंता व्यक्त केली होती.

या पार्श्वभूमीवर विमाननगर परिसरातील रहिवाशांनी वाहतूक पोलिसांशी चर्चा करून एकमार्गी वाहतूक योजनेचा आराखडा तयार केला. या आराखड्यानुसार गंगापूरम चौक ते गणपती मंदिर चौक हा रस्ता एकमार्गी करण्यात आला आहे. तसेच श्रीकृष्ण चौक ते सीसीडी चौक हा मार्गही एकमार्गी ठेवण्यात आला आहे. या दोन मुख्य मार्गांना जोडणारे सर्वच मधील चौक आणि जोडरस्ते मात्र पूर्वीप्रमाणे दुहेरी वाहतुकीसाठी उघडे ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे स्थानिक वाहतुकीला अडथळा न येता मुख्य रस्त्यांवरील ताण कमी करण्याचा उद्देश ठेवण्यात आला आहे.




### नागरिकांनी घेतला होता पुढाकार

» या मागणीसाठी विमाननगर रहिवाशांनी पुढाकार घेतला होता. विवेक देओ, अनिता हनुमंते, श्याम कुद्याडी, बिनोद पिल्लई, पवन शर्मा, सोनू सिंह, विल्यम मायकेल आणि अश्विनी देसाई यांच्यासह आदी रहिवाशांनी नियोजन, निरीक्षण आणि जनजागृती मोहीम याबाबत पुढाकार घेतला. वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांनी या उपक्रमास आवश्यक सहकार्य आणि मार्गदर्शन केले. तसेच सुरेंद्र पठारे फाउंडेशनने या मोहिमेला पाठिंबा देऊन वाहतूक व्यवस्थापन आणि जनजागृती कार्यक्रमात सक्रिय भूमिका निभावली.

### प्रवासातील वेळ वाचणार

» दत्त मंदिर चौक आणि कैलास सुपर मार्केट चौक या परिसरातील मुख्य दोन वाहतुकीच्या केंद्रांदरम्यान दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची गर्दी वाढते. कार्यालयीन वेळा, शाळा-कॉलेजची वेळ आणि सुटीच्या दिवशी तर कोंडीत अधिकच भर पडते. वापरात असलेल्या रस्त्यांची रुंदी मर्यादित असल्याने आणि चुकीची पार्किंग पद्धत तसेच लेनशिस्त न पाळणाऱ्या वाहनांमुळे सामान्य प्रवाशांचे हाल होत होते. या एकमार्गी योजनेमुळे दोन्ही चौकांमधील वाहतूक सुलभ होईल, प्रवासाचा वेळ कमी होईल आणि पादचाऱ्यांसाठीही रस्ते अधिक सुरक्षित होतील, असा दावा केला जात आहे.

### असा आहे वाहतुकीतील बदल

» श्रीकृष्ण हॉटेल चौक ते दत्तमंदिर चौक ते सीसीडी चौकाकडे जाणारा रस्ता हा एकेरी करण्यात येत आहे.
» गंगापुरम चौक ते कैलास सुपर मार्केट चौक ते गणपती मंदिर चौकाकडे जाणारा रस्ता हा वन-वे करण्यात येत आहे
» सीसीडी चौक ते गंगापुरम चौक, दत्तमंदिर चौक ते कैलास सुपर मार्केट चौक, गणपती मंदिर चौक ते श्रीकृष्ण हॉटेल चौक दरम्यानचे रस्ते हे दुतर्फा वाहतुक सुरु राहतील.

# कोथरूडमध्ये मेट्रो सेवेवर का होतोय परिणाम? मूल्यांकन अहवालातून आले समोर

## महामेट्रोच्या पाच पुणे मेट्रो स्थानकांच्या परिसरातील पदपथांची चार किलोमीटर अंतरापर्यंत दुरवस्था झाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या (महामेट्रो) वनाझ, आनंद नगर, आयडियल कॉलनी, नळ स्टॉप आणि गरवारे कॉलेज या पाच मेट्रो स्थानकांच्या परिसरातील पदपथांची चार किलोमीटर अंतरापर्यंत दुरवस्था झाली आहे. त्यामुळे मेट्रोचे प्रवासी आणि पादचाऱ्यांसाठी ही बाब त्रासदायक होत असल्याचे 'पादचारी अनुकूलता मूल्यांकन अहवाला'तून निदर्शनास आले आहे.महामेट्रोने 'पुणे नॉलेज क्लस्टर', 'पर्यावरण अन् शाश्वत विकास शिक्षण संस्था' आणि 'सेव्ह पुणे ट्रॅफिक मूव्हमेंट' या तीन संस्थांबरोबर 'चालत, बस-सायकल अन् मेट्रो' ही मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेंतर्गत या संस्थांनी मेट्रो स्थानक परिसरातील पदपथांचा अभ्यास करून 'पादचारी अनुकूलता मूल्यांकन अहवाल' तयार केला आहे.

महामेट्रोच्या रामवाडी ते वनाज या मार्गिकेवरील वनाझ, आनंदनगर, आयडियल कॉलनी, नळ स्टॉप आणि गरवारे कॉलेज या पाच मेट्रो स्थानकांभोवती अभ्यास करण्यात आला. यामध्ये अनेक ठिकाणी प्रामुख्याने पदपथांवर खाद्यपदार्थ विक्रेत्यांचे अतिक्रमण, झाडांच्या मुळांमुळे तुटलेले पदपथ, पदपथांवर कचऱ्याचा ढीग पडल्याचे आढळून आले. त्यामुळे मेट्रो प्रवाशांसह नागरिकांना चालणेही कठीण होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.कोथरूड येथील शिक्षक नगरमधील योगानंद पार्क गृहनिर्माण संस्था ते रामचंद्र माने हा रस्ता वनाज मेट्रो स्थानकाला जोडण्यात आला आहे. या रस्त्यालगत शाळा, बस थांबे, दुकाने, निवासी सोसायट्यांचे जोडमार्ग आहेत. या ठिकाणी खाद्यपदार्थ विक्रेत्यांचे अतिक्रमण, पदपथाच्या तुटलेल्या फरश्या, पदपथावर झाकणे नसलेले चेंबर यांचा अडथळा होत असल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

महामेट्रोच्या 'चालत, बस-सायकल अन् मेट्रो' या मोहिमेंतर्गत 'पादचारी अनुकूलता मूल्यांकन' अहवाल तयार करण्यात आला आहे. त्यानिमित्ताने गृहनिर्माण संस्था, स्थानिक नागरिक आणि मेट्रो प्रवाशांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. तीन हजारांहून अधिक नागरिकांनी महापालिकेला पादचारी रस्ते आणि सुविधांची अंमलबजावणी करण्याबाबतचे पत्र दिले आहे.




### सर्वाधिक वर्दळ असलेले रस्ते

» नानासाहेब धर्माधिकारी रस्ता, नानासाहेब सुतार रस्ता, स्वामी विवेकानंद रस्ता आणि श्रीपती सुथार या चार रस्त्यांवर वाहतुकीची वर्दळ, पदपथांचा अभाव, खड्डे यामुळे स्थानकापर्यंत पोहचणे प्रवाशांना कठीण होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

# इंदापूरमध्ये निवडणुकीच्या धामधुमीत शासकीय कामकाज ठप्प

## पंचायत समिती, तहसील कार्यालयात शुकशुकाट; नागरिकांना 2 डिसेंबरची प्रतीक्षा

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यात नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या धामधुमीला उधाण आले असून, संपूर्ण तालुक्याचे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. निवडणूक पूर्वतयारीसाठी प्रशासन पूर्ण क्षमतेने गुंतल्यामुळे पंचायत समिती, तहसील कार्यालय आणि नगरपरिषदेतील बहुतांश नियमित कामकाजावर परिणाम झाला आहे. याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत असून, अनेकांना आता निवडणूक संपेपर्यंत म्हणजेच २ डिसेंबरपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे

सध्या दोन्हीही कार्यालयांत अधिकारी आणि कर्मचारी निवडणूक कामात व्यस्त असल्याने शुकशुकाट दिसत आहे. २ डिसेंबर रोजी इंदापूर नगरपरिषदेची निवडणूक पार पडणार असल्याने, मतदान यादी, मतदान केंद्र तपासणी, प्रशिक्षण, मतदान साहित्याची तयारी आदी कामांसाठी पंचायत समिती, महसूल विभाग आणि नगरपरिषद यंत्रणेतील अधिकारी-कर्मचारी यांची ड्युटी लावण्यात आली आहे.यामुळे पंचायत समितीचे कृषी, आरोग्य, शिक्षण संबंधित कामे, महसूल विभागातील ७/१२, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, नामांतरे आणि नगरपरिषदेमधील दैनंदिन अर्ज व सेवा केंद्राची कामे जवळपास ठप्प झाली आहेत.




### निवडणुकीनंतरच प्रशासनाला गती

» मतदान प्रक्रियेनंतरही प्रशासकीय यंत्रणेला परिणामकारक कामकाजासाठी काही दिवस लागतात. त्यामुळे बहुतांश नागरिकांना प्रलंबित कामांसाठी निवडणूक झाल्यानंतरच कार्यालयात यावे लागेल, अशी अपेक्षा आहे. शासकीय यंत्रणा निवडणूककेंद्रित झाल्याने सामान्यांचे कामकाज या काळात दुर्लक्षित राहणे अपरिहार्य ठरले आहे.

तालुक्यात अजित पवार यांच्या राष्ट्रवादी विरोधात भाजप, शरद पवारांची राष्ट्रवादी व इतर संघटना एकत्र येणार असल्याचे बोलले जात आहे. याची झलक इंदापूर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर दिसून येत आहे. महाविकास आघाडी, महायुती या दोन्हींमध्ये स्थानिक पातळीवर युती होणार नाही, हे निश्चित झाले आहे.इंदापूरच्या राजकारणात अनेक घडामोडी घडणार असल्याचे बोलले जात आहे. एकंदरीतच निवडणुकीची शिट्टी वाजणे बाकी असून मैदानावर गलबला सुरू झाला आहे.

त्यामुळे होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत कोण कोणावर भारी पडतं? याकडे तालुक्यातील जनतेचे लक्ष वेधले आहे. विधानसभा निवडणुकीत माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या पराभवानंतर कार्यकर्ता अस्वस्थ होता. याउलट मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे उमेदवारीसाठी कार्यकर्त्यांची मागणी वाढली होती. परंतु, इंदापूर तालुक्यात सध्या होऊ घातलेल्या आघाडीच्या राजकारणामध्ये हर्षवर्धन पाटील यांचा कार्यकर्ता सक्रिय झाला असून पाटील – माने – गारटकर एकत्र आल्याने उमेदवारीसाठी दावेदारी करू लागला आह

इंदापूर तालुक्यात नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या धामधुमीला उधाण आले असून, संपूर्ण तालुक्याचे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. निवडणूक पूर्वतयारीसाठी प्रशासन पूर्ण क्षमतेने गुंतल्यामुळे पंचायत समिती, तहसील कार्यालय आणि नगरपरिषदेतील बहुतांश नियमित कामकाजावर परिणाम झाला आहे.

### लाभार्थी बघत आहेत वाट

» महसूल आणि पंचायत समितीकडून लाभ मिळवणारे शेतकरी आणि नागरिकही परिस्थिती ओळखून निवडणूक होईपर्यंत प्रतीक्षा करत आहेत. "निवडणुका झाल्याशिवाय फाईल हलत नाही," अशी भावना अनेकांनी व्यक्त केली आहे. अधिकारी कार्यालयात नसल्याने कामे गतीने सुरू होण्यासाठी २ डिसेंबरची वाट पाहतो आहोत, असे काही शेतकऱ्यांनी सांगितले.

### राजकीय वातावरण तापले

» इंदापूर नगर परिषदेची १७ नोव्हेंबर ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत असल्याने, राजकीय हालचालींना गती आली आहे. नगराध्यक्ष पदासह नगरसेवक पदासाठी कोण अर्ज दाखल करणार, याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे. गटबाजी आणि उमेदवारांची धावपळ यामुळे तालुक्यात राजकीय चर्चांना जोर आला असून, अर्ज मागे घेण्याची तारीख संपताच प्रचाराचे रणांगण खुलणार आहे.

# प्रदीप गारटकरांचा अजितदादांना राम-राम; बंडाला शिवसेना-भाजप अन् शरद पवार गटाचीही साथ?

## इंदापूर नगरपरिषद निवडणुकीत प्रदीप गारटकर यांनी अजित पवार गटाची अधिकृत उमेदवारी डावलून विरोधातच निवडणूक लढवण्याचा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुका जोरात सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)मध्ये मोठा राजकीय भूकंप झाला आहे. उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी पक्षाला रामराम ठोकत बंडाची घोषणा केली असून अधिकृत उमेदवाराविरोधातच निवडणूक लढवण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला आहे.

इंदापूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीवरून पक्षात गेल्या काही दिवसांपासून घोळ सुरू होता. माजी उपनगराध्यक्ष भरत शहा यांना तिकीट देण्यास गारटकर यांच्या समर्थकांनी जोरदार विरोध दर्शवला होता. स्वतः गारटकर यांनी नगराध्यक्ष पदाची उमेदवारी मागणी केली होती आणि "अन्याय सहन करणार नाही," असा इशारा त्यांनी नेतृत्वाला दिला होता



गारटकर यांनी नवीन 'विकास आघाडी' उभारून त्याच्याच माध्यमातून नगराध्यक्ष पदासाठी आज अर्ज दाखल करणार असल्याचे सांगितले. तसेच इतर काही पक्षांचा पाठिंबा मिळत असल्याचाही त्यांनी दावा केला आहे

दरम्यान, अजित पवार गटाने भरत शहा यांना उमेदवारी दिल्यानंतर भाजप, दोन्ही शिवसेना आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने गारटकर यांच्या पाठीशी उभे राहण्याची शक्यता राजकीय वर्तुळात जोरदार चर्चेत आहे. जरी अधिकृत घोषणा झालेली नसली तरी या तिन्ही पक्षांत अंतर्गत चर्चा सुरू असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. यामुळे पुणे जिल्ह्यात अजित पवारांच्या विरोधात एक नवीन आघाडी उभी राहण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत.

दरम्यान, पक्षाच्या जिल्हाध्यक्षानेच बंडाच निशाण फडकावल्यानंतर इंदापुरच्या या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याच लक्ष लागलं आहे. त्यामुळे गारटकर आणि अजित पवारांची प्रतिष्ठा देखील पणाला लागली आहे. त्यामुळे यामध्ये कोण बाजी मारणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

### आता गप्प बसणार नाही

» मात्र, हा इशारा दुर्लक्षित करत पक्षाने शहा यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आणि त्यांनी अर्जही दाखल केला. या घडामोडीनंतर गारटकर यांनी बंडाची बिगुल फुंकत जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली आहे. पक्ष निष्ठेने काम करूनही वारंवार डावलले गेल्याचा आरोप त्यांनी केला. "नगराध्यक्ष पदाची उमेदवारीही नाकारली गेली, त्यामुळे आता गप्प बसणार नाही," असे ते म्हणाले.